Nutan Vidyalaya Sevabhavi Education Society, Umri

**Late Babasaheb Deshmukh Gorthekar Art's, Commerce & Science Mahavidyalaya, Umri, Dist. Nanded (M.S.)**

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

(Recognition U/S 12(B), 2 (F) of the UGC Act 1956)

*Website : www.lbdgmu.in*

*Email: lbdgcollege@rediffmail.com*

# One day Interdisciplinary National Conference

**On**

# "Rural Development : Issues & Challenges"

**21st December 2019**

**Organized by**

**Internal Quality Assurance Cell**

**Late Babasaheb Deshmukh Gorthekar Art's, Commerce & Science Mahavidyalaya, Umri**

**Collaboration with**

**Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded (M.S)**

**Chief Editor**

**Dr. Tukaram Vaijanathrao Powale**

**Co – Editor**

**Dr. Z. R. Pathan,** **Dr. D. D. Kolhekar,**

**Dr. G. P. Yedle,** **Dr. V. V. Bhoyar.**

# सहकारी साखर उद्योग व ग्रामीण विकास

**प्रा. डॉ. माधवराव नरसिंगराव बिरादार**
*सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग*
*दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि.नांदेड*

**प्रस्तावना :–**

भारत हा खेडयाने बनलेला देश आहे. देशात सुमारे सहालाखापेक्षाही अधिक खेडी आहेत. आज ही एकूण लोकसंख्येच्या महत्तम लोकसंख्या खेडयात राहते. अन्नधान्य व इतर कच्चामाल यांचे उत्पादन ग्रामीण भागातूनच होत असते आणि या बाबतीतील शहरांची गरज ग्रामीण उत्पादनातूनच भागविली जाते. शिवाय शहरातील औद्योगिक व्यवसायाना श्रमिक पूरविण्याची जबाबदारीही ग्रामीण भागच पार पाडतात. राष्ट्राची नैसर्गिक साधनसंपत्ती प्रामूख्याने ग्रामीण प्रदेशातच उपलब्ध होते. त्यामूळे जोपर्यंत ग्रामीण भागाचा विकास होणार नाही तोपर्यंत भारताचा विकास होणे शक्य नाही म्हणूनच महात्मा गांधी म्हणाले होते 'दिल्ली भारत नहीं है, भारत तो गावोंमें बसता हे! आज भारत हा जागतिक महासत्ता बनण्याच्या वाटेवर असतांना ग्रामीण भागाची आर्थिक व सामाजिक उन्नती होणे गरजेचे आहे. १९५० नंतर शासनाने ग्रामीण विकासाच्या अनेक योजना राबविल्या परंतु ग्रामीण भागाचा विकास अद्यापही अपेक्षेइतका झाला नाही. विकासाच्या बाबतीत ग्रामीण भागात अजूनही बराच मागे आहे. ग्रामीण भागाचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर शेती व शेतीवर आधारित उद्योगाची भूमिका महत्त्वाची आहे. कारण ग्रामीण क्षेत्राचा मूख्य व्यवसाय कृषी असून कृषी क्षेत्राचे वर्चेस्व हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मूख्य वैशिष्टे असल्याने ग्रामीण विकासावरच भारताचा सर्वांगिण विकास अवलंबून असल्याचे दिसते. जर ग्रामीण भागात शेती मालावर आधारित उद्योग निर्माण झाल्यास ग्रामीण भागातील लोकांना उपजिविकेसाठी रोजगाराचे साधन उपलब्ध होईल. त्यामुळे रोजगारनिमित्त्ये शहराकडे धाव घेणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. म्हणूनच स्थलांतराला आळा घालण्यासाठी अशा उद्योगाची गरज आहे. तसेच प्रादेशिक विषमता कमी करण्यासाठी, उद्योगाचे विकेंद्रीकरण होण्यासाठी, असलेल्या साधनसामग्रीचा सदूपयोग करणे आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी कृषी आधारित उद्योगाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणूनच शेती व शेतीवर आधारित उद्योग यांची योग्य प्रकारे सांगड घातल्यास देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी भरपूर फायदा होतो.

साखर उद्योग हा शेतमालावर आधारित उद्योग असून त्याची उभारणी ग्रामीण भागात झालेली आहे. ग्रामीण औद्योगिकरण आणि शेती उत्पादनात वाढ या दृष्टीने भारतातील साखर कारखान्याचे कार्य अतिशय महत्त्वाची मानले जाते. प्रस्तूत शोधनिबंधात ग्रामीण विकासाची

संकल्पना, महाराष्ट्रातील साखर उद्योगाची सद्यस्थिती आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात सहकारी साखर उद्योगांचे योगदान इत्यादीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**ग्रामीण विकासाची संकल्पना :–**

संयुक्त राष्ट्र संघटनेने ग्रामीण विकासाची संकल्पना पूढील शब्दात मांडली आहे. "शासनाच्या व लोकांच्या संघटीत प्रयत्नाद्वारे सर्व समाजाच्या आर्थिक सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणारी व राष्ट्रीय विकास कार्यक्रमांना हातभार लावण्यास शिकविणारी प्रक्रिया म्हणजेच ग्रामीण विकास होय." भारतीय नियोजन मंडळाने ग्रामीण विकासाची संकल्पना अशी केली आहे की, "ज्या प्रक्रियेमूळे जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणली जाते त्या प्रक्रियेस ग्रामीण विकास असे म्हणतात." नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्ये सेन यांनीही कोणत्याही राष्ट्राच्या स्थिर व समतोल विकासासाठी ग्रामीण भागाच्या विकासावर भर दिला आहे.

थोडक्यात, ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागातील दारिद्रयेरेषेखाली जीवन जगणाऱ्या जनतेचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आखलेल्या योजना आणि या योजनांची अंमलबजावणी होय.

**महाराष्ट्रातील साखर कारखाण्यांची स्थापना व सद्यस्थिती:–**

साखर उद्योग हा शेतमालावर आधारित असा महाराष्ट्रातील एक महत्त्वाची उद्योग होय. ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनी ऐच्छिकरित्या एकत्र येवून सहकार तत्त्वावर साखर कारखाने स्थापन केले आहेत. सहकारी साखर कारखाने प्रामूख्याने ऊसाला चांगली किंमत मिळवून देणे, शेतकऱ्याला दर्जेदार ऊसाची लागवड करण्यासाठी आधुनिक शेती उत्पादन व व्यवस्थापनाची माहिती देणे, शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या खते, बी–बियाणे, जंतूनाशके या घटकाच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना कर्ज देणे, किंवा या वस्तू स्वतः खरेदी करुन पूरविणे, ऊसाच्या वाहतूकीची व्यवस्था करणे, प्रक्रिया केलेल्या साखरेची विक्री करणे, ऊसाची साखर करण्याच्या उद्योगाबरोबरच बाहेर पडणाऱ्या मळीपासून देशी दारु व स्पीरीट यांचे उत्पादन करणे, साखर कारखाने व त्यापासून येणारी इतर उत्पादने यामध्ये शेतकरी व ग्रामीण भागातील व्यक्तींना रोजगार मिळवून देणे, शेतकऱ्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधून त्यांच्या राहणीमानात सुधारणा करणे इत्यादी उध्देशाने व कार्ये करण्यासाठी स्थापन केले जातात.

सन १९४९ मध्ये महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील सहकारी तत्त्वावरील पहिला साखर कारखाना श्री विखे पाटील यांनी उभारला. पूढील काळात महाराष्ट्रातील साखर उद्योगांनी त्यातही सहकारी तत्त्वावरील साखर उद्योगांनी मागे वळून पाहिले नाही. भारतातील एकूण साखर कारखान्यापैकी सर्वाधिक (३६ टक्के) कारखाने महाराष्ट्रात असून खंबीर नेतृत्व लाभल्यामूळे ती यशस्वी ठरली आहेत. आज महाराष्ट्र राज्याची विशेषतः ग्रामीण भागाची जी

प्रगती झाली आहे. त्यात सहकारी साखर कारखान्यांचे मोलाचे योगदान आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याची सद्यस्थिती पूढील सांख्यिकीय माहितीवरुन स्पष्ट होत

तक्ता – सहकारी साखर कारखान्याची सांख्यिकी

| तपशील | ३१ मार्च २०१८ |
|---|---|
| नोंद्णीकृत सहकारी साखर कारखानें | १७८ |
| उत्पादन चालू असलेले कारखाने | १०१ |
| संभासद (हजारात) | २७६३३ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (रु.कोटीमध्ये) | १२९९.४७ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता (लाख मे.टन) | ३.८५ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे.टन) | ५७३.३५ |
| साखर उंत्पादन (लाख मे.टन) | ६५.६९ |
| सरासरी उंन्तारा (टक्केवारी) | ११.४६ |
| सहविजनिर्मिती प्रकल्प असलेल्या कारखान्याचे संख्या | ५९ |
| तोटयातील कारखाने | ८० |

आधार – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१८–१९

**सहकारी साखर कारखान्याचे ग्रामीण विकासातील योगदान:–**

सहकारी साखर कारखान्याचे महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासातील योगदान पूढील दृष्टीकोनातून स्पष्ट करता येते.

**१) ऊस लागवड आणि उत्पादनात वाढ**–ऊसाची लागवड शास्त्रशुध्द पध्दतीने करण्यासाठी माती परीक्षण करणे, शुध्द बी–बियाणांचा पुरवठा व वापर, खताचा योग्य वापर, जंतूनाशकाचा योग्यवेळी वापर, ऊसाची लावगड करण्याची शास्त्रशुध्द पध्दती अवलंबणे, शेतकऱ्यांना पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यासाठी प्रोत्साहन देणे, ऊस तोडणीचे वेळापत्रक ठरविणे आणि त्यानूसार ऊस तोडणी करुन कारखान्यास पाठविणे या सर्व बाबीवर साखर कारखाने शेतकऱ्यास मदत करतात. त्यामूळे गेल्या कांही वर्षात ऊसाचे उत्पादन वाढण्यास मदत झाली असून ग्रामीण भागातील जनतेच्या उत्पादनाच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**२) रोजगाराची उपलब्धता**– सहकारी साखर कारखान्यांचे कार्यक्षेत्र ग्रामीण भाग असल्यामुळे कार्यक्षेत्रातील लोकांना रोजगाराची संधी प्राप्त झाली आहे. साधारणपणे कारखान्यातील हंगामी कामगार व कायम कर्मचाऱ्यांची नियूक्ती स्थानिक लोकांना प्राधान्य देवून होते. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊस तोडणी व वाहतूक यामध्ये सूमारे चार हजार मजूरांना काम

मिळू शकते. म्हणजे एक कारखाना पाच ते सहा हजार लोकसंख्येचे उपजिवीकेचे साधन बनले आहे. ग्रामीण भगातील सहकारी कारखानदारी संबंधीत कूटूंबाना वरदानच ठरले आहे.

**३) विविध सोयी —सुविधेत वाढ** — सहकारी साखर कारखान्यांनी ऊस वाहतूक करण्याच्या निमित्ताने पूढाकार घेवून लहान खेडयापर्यंत रस्ते व जोडरस्ते सुरु करण्यात यश मिळविले आहे. कारखाने उभारल्यानंतर बँका, पोस्ट ऑफिस, टेलीफोन, वीज, पक्के रस्ते, सांस्कृतिक केंद्र अशा कितीतरी सोयी खेडोपाडी पोहोचल्या. ग्रामीण लोकांच्या राहणीमानाविषयी कल्पना बदलण्यास कारखाने अप्रत्यक्ष जबाबदार आहेत.

**४) शिक्षणाचा प्रसार** — बहूतेक सहकारी साखर कारखान्यांनी केवळ आर्थिक विकासावर लक्ष केंद्रीत न करता शैक्षणिक कार्यावर देखील भर दिलेला आहे. ग्रामीण भागात बालवाडया, शाळा—महाविद्यालये इंत्यादी शिक्षण संस्था सुरु करुन शेतकऱ्यांच्या मूलाला शिक्षणविषयक सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. खेडयातील मूलांना शिक्षणाची दारे खूली करण्याचे कार्य केवळ शासनावर अवलंबून न राहता साखर कारखान्यांनी पूढाकार घेवून पूर्ण केले आहे.

**५) औद्योगिक आणि व्यावसायिक उपक्रमांना उत्तेजन** — सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागात औद्योगिक आणि व्यावसायिक उपक्रम स्थापन होण्यास उत्तेजन मिळाले आहे. विशेषत: कृषी व्यवसायासाठी उपयुक्त यंत्रे व हत्याराची निर्मिती, स्वयंचलीत वाहनसेवा केंद्रे, खते उत्पादन, रसायन निर्मिती, डिस्टीलरी, ट्रक्टर रिपेअरींग, स्पेअर पार्ट विक्री, पशु खाद्य प्रकल्प, पेपर मिल, किराणा माल दूकाने, विभागीय वस्तू भांडारे, जनता स्टोअर्स, हॉटेल्स, बेकरीज्, पक्षीपालन, वराहपालन, इत्यादी व्यवसाय साखर कारखान्याच्या जवळपास सुरु होतात. सहकारी साखर कारखाने ग्रामीण भागातील जनतेला वरील प्रकारचे उपक्रम सुरु करण्यास प्रोत्साहन देतात.

**६) वीज आणि पाणीपुरवठा** — शेतीला नियमितपणे पाणीपुरवठा करता यावा यासाठी कारखाने शेतकऱ्यांना लघू पाणीपूरवठा योजना चालू करण्यास आर्थिक मदत देतात. साखर कारखाने पाणी टंचाईच्या काळात कार्यक्षेत्रातील गावांना टॅकरने पाणीपूरवठा करतात. कांही साखर कारखाने हंगामात वीजेची निर्मिती करतात. कार्यक्षेत्रातील गावातून पंपावर तसेच घरात वापरण्यासाठी विजेची सोयी केल्यामूळे रेडीओ, आणि दूरचित्रवाणीची सोय ग्रामीण भागात पोहोचण्यास मदत झाली आहे.

**७) शती विकासाला चालना** — राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी शेती विकासाला चालना देण्यासाठी शेतकऱ्यांना बैलजोडी, व बैलगाडी, ऑईल इंजिन्स, इलेक्ट्रीक मोटर्स, ट्रक्टर, मालट्रक, आधुनिक अवजारे व यंत्रे सभासद शेतकऱ्यांना खरेदी करता यावी म्हणून कारखाने राष्ट्रीयकृत बॅकांना हमी देवून उपलब्ध करुन देत आहेत. त्यामूळे शेती आदानाची खरेदी करण्याची प्रकृती शेतकऱ्यामध्ये वाढून शेती विकासाला चालना मिळत आहे.

८) शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासात वाढ— कारखान्यामार्फत आयोजित केले जाणारे सेमिनार, परीसंवाद यामूळे शेतकऱ्यांच्या मनात निरनिराळया प्रश्नासंबंधी जागरुकता निर्माण झाली आहे. विचाराची देवाण—घेवाण आणि शेतीविषयक प्रश्नांची चर्चा यामूळे शेतकऱ्यांना एक प्रकारचे अनौपचारीक शिक्षण मिळत आहे. अप्रत्यक्षरीत्या जाणिवा जागृत करण्याचे व प्रबबोधनाचे कार्य होत असल्याने शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली आहे.

**सारांश :—**

सहकारी साखर कारखाने ग्रामीण भागात कार्यरत असल्यामूळे ग्रामीण भागाच्या सर्वांगिण विकासाची महत्त्वपूर्ण भूमीका पार पाडावी लागत आहे. सहकारी साखर कारखान्यामूळे ऊस उत्पादक शेतकरी कारखानदार झाले. त्यामूळे त्यांना विविध लाभ मिळू लागले आहेत. कारखान्यामूळे ऊसाला निश्चित बाजारपेठ व योग्य किंमतीची हमी मिळाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाली. त्यांचे राहणीमान सुधारले. साखर कारखान्याच्या प्रगतीमुळे ग्रामीण भागात उद्योजकता वाढीस लागली असल्यामूळे ग्रामीण भागात आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे वारे वाहत आहे. कारखान्याच्या परिसरात इतर अनेक छोटे उद्योग सुरु झाले. जसे अल्कोहल उत्पादन, कागद निर्मिती, कुक्कूटपालन, वराहपालन इत्यादी सभासदाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीबरोबरच कामगार आणि समाज यांच्या कल्याणाचे प्रयत्न सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात होत आहेत. जसे शाळा, महाविद्यालये, दवाखाने; सांस्कृतिक केंद्रे इत्यादी प्रकल्प राबविले जात आहेत. सहकारी साखर कारखान्यामूळे ऊस लागवड व उत्पादनात वाढ झाली. रोजगाराची उपलब्धता, शिक्षणाचा प्रसार, विविध औद्योगिक व व्यावसायिक उपक्रमांना उत्तेजन ग्रामीण रस्ते बांधणी, वीज आणि पाणी पुरवठा, महिला कल्याण, सामूदायीक विवाह, गृहनिर्माण, ऊस उत्पादक व बिगर ऊस उत्पादक यांच्यात काटकसर व बचतीची जोपासना इत्यादीमूळे राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कायापालट होत असल्याचे दिसून येते. थोडक्यात, ग्रामीण भागातील नागरीकांचा विकास म्हणजे राष्ट्रीय विकास होय. हे सहकारी साखर कारखान्यांनी सिध्द केले आहे.

**संदर्भसूची :—**


१) रायखेलकर ए.आर./अशोक डांगे (१९८९) सहकार तत्त्व आणि व्यवहार, मेहता पब्लिशिंग हाऊस, पूणे.

२) जोशी सी.जे.(२०००), सहकाराचा विकास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

३) माधव बिरादार (२०१४), सहकार,विद्या बूक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

४) विजय कमिमंडन(२०१२),कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) मेधा कानेटकर/वैशाली सईकर (२०१३), सहकार व ग्रामीण विकास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

६) अर्थसंवाद, ग्रामीण अर्थव्यवस्था विशेषांक (एप्रील,जून २०१५) खंड ३९ अंक १.

७) रायखेलकर ए.आर./दामजी (२०११) औद्योगिक अर्थशास्त्र, विद्याभूषण पब्लिकेशन, औरंगाबाद.

८) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१८–१९) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग मुंबई.